

# जपानी भाषा विभागाच्या ८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

जपान सरकारतर्फे दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या प्रतिष्ठित मोंबुशो शिष्यवृत्ती परीक्षेत टिमविच्या जपानी विभागाच्या ८ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जाहीर झाली आहे. या शिष्यवृत्तीच्या अंतर्गत हे विद्यार्थी त्यांनी निवडलेल्या जपानी विद्यापीठात १ वर्ष जपानी भाषेचे किंवा संस्कृतीचे अध्ययन करतील. शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांची नावे आणि विद्यापीठे खालील प्रमाणे

१.पाठक मानस - नागोया विद्यापीठ २. हिमांशी नथानी - ओसाका विद्यापीठ ३. मझुमदार कौशिक - वाकायामा विद्यापीठ ४. वनारसे साक्षी - कोक्काईदो विद्यापीठ ५. काजल भाटिया - शिझुओका विद्यापीठ ६. पंडित मिहीर - ओसाका विद्यापीठ ७. जोशी अनुष्का - तोत्तोरी विद्यापीठ ८. कुलकर्णी कल्याणी - साईतामा विद्यापीठ

टिमविच्या जपानी भाषा विभागातील माबुशो शिष्यवृत्तीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ७० टक्क्यांहून अधिक आहे. हि निवड टिमविच्या जपानी भाषा विभागातील माबुशो शिष्यवृत्तीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या ७० टक्क्यांहून अधिक आहे. हि निवड देशभरातून होत असते . विद्यार्थ्यांच्या निवडीबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे. विद्यापीठाचे कुलपती डॉ . दीपक टिळक , कुलगुरू डॉ. गीताली टिळक , टिमवि ट्रस्टचे सचिव अजित खा-डीलकर यांच्यासह विभागाच्या विभागप्रमुख व विभागाचे समन्वयक सुप्रिया फाटक , राधिका कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.